# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
**डॉ. शिवाजी हुसे**
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३
मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-३]

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. सर्जेराव जिगे डॉ. यशवंत सोनुने

● संपादक मंडळ ●

डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. एकनाथ शिंदे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. राज मुसणे
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम
डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. पी. एन. डापके | १ - ३ |
| २. | छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक व अर्थविषयक धोरणे<br>- डॉ. एस. जी. मद्रेवार व डॉ. आर. ई. मारवाडी | ४ - ६ |
| ३. | शिवाजी महाराजांचे प्रशासन<br>- डॉ. विलास खुणे | ७ - ९ |
| ४. | छत्रपती शिवाजी महाराजांचे अर्थ नियोजन<br>- डॉ. सुभाष राठोड | १० - १३ |
| ५. | छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ<br>- सुवर्णा ज्ञानेश्वर हजारे | १४ - १८ |
| ६. | छत्रपती शिवाजी महाराज आणि भावनिक बुद्धिमत्ता - एक चिकित्सक अभ्यास<br>- डॉ. महेश भास्कर[१], रुस्तुम दराडे[२], स्मिता सातपुते[३] | १९ - २४ |
| ७. | छ. शिवरायांच्या स्वराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी<br>- डॉ. वासुदेव भाऊसाहेब उगले | २५ - २७ |
| ८. | छत्रपती शिवाजी महाराज व त्यांची व्यवस्थापनशास्त्रविषयक भूमिका<br>- स्मिता सातपुते[१] व डॉ. महेश भास्कर[२] | २८ - ३१ |
| ९. | छत्रपती शिवाजी महाराज यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व<br>- मारोती ज. कंधारे | ३२ - ३५ |
| १०. | सभासदाची बखर : छत्रपती शिवाजी महाराजांचे समकालीन वास्तव<br>- डॉ. शिवराज काचे | ३६ - ३९ |
| ११. | शिवकालीन कृषी व्यवस्थापन आणि विकास<br>- रुस्तुम दराडे व डॉ. महेश भास्कर | ४० - ४३ |
| १२. | छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तित्व<br>- डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ | ४४ - ४६ |
| १३. | नाटककार वसंत कानेटकर यांच्या ऐतिहासिक नाटकातील शिवाजी<br>- डॉ. मीनाक्षी विठोबा भोयर | ४७ - ५४ |
| १४. | छत्रपती शिवाजी महाराज – व्यक्तिमत्त्व<br>- प्रियांका विनायक पाटील | ५५ - ५८ |
| १५. | छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व<br>- डॉ. दत्ता उद्धव जाधव | ५९ - ६२ |

| | | |
|---|---|---|
| १६. | छत्रपती शिवाजी महाराज – तर्कशुद्ध आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व<br>- डॉ. महेश भास्कर व डॉ. शिरीष गवळी | ६३ - ६७ |
| १७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. गणेश शिंदे व डॉ. लहू घोरपडे | ६८ - ७० |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- सुशीला लक्ष्मण जगधने | ७१ - ७२ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा धार्मिक दृष्टिकोन : चिकित्सक मांडणी<br>- डॉ. विकास मोहन सरनाईक | ७३ - ७६ |
| २०. | शिवरायांचे आरमार आणि दूरदृष्टी<br>- डॉ. श्वेता बा. चौधारे | ७७ - ७९ |
| २१. | शिवकालीन भाषा व लेखनपद्धती<br>- डॉ. सायली आचार्य | ८० - ८४ |
| २२. | मराठी कादंबरी व ग्रंथांमध्ये आलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे संदर्भ - डॉ. सखाराम डाखोरे | ८५ - ८८ |
| २३. | मराठी कवितेत शिवाजी महाराजांचे चित्रण<br>- योगिता चोडणकर | ८९ - ९३ |
| २४. | शिवकालीन अर्थव्यवस्था : एक अभ्यास<br>- डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे व डॉ. राजाभाऊ गायकवाड | ९४ - ९६ |
| २५. | स्वराज्याचे अधिष्ठान : मुलकी शासनव्यवस्था<br>- अविनाश सुदाम भालेराव | ९७ - १०० |
| २६. | शिवरायांचा स्त्रीविषयक क्रांतिकारी धोरण<br>- शहेनाज देशमुख | १०१ - १०४ |
| २७. | सभासद बखर : महापुरुषांच्या जीवनाच्या उज्ज्वल दीप्तीमध्ये शोकांतिकेची एक अनाकलनीय किनार - कृष्णा रतन बनसोडे | १०५ - १०८ |
| २८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- किशोर शेषराव चौरे | १०९ - १११ |
| २९. | महात्मा जोतिबा फुले यांच्या पोवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तित्व<br>- डॉ. युवराज धबडगे व नागेश बोंतेवाड | ११२ - ११५ |
| ३०. | छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार आणि देशातील आजच्या लोकशाहीची झालेली अवस्था - ईश्वर रावसाहेब आडसूळ | ११६ - ११९ |
| ३१. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- डॉ. सुषमा देशपांडे व कविश्री देशमुख | १२० - १२३ |

| | | |
|---|---|---|
| ४८. | शिवविचार – छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा<br>- प्रफुल्लसिंग सुवर्णसिंग राजपूत व प्रा. डॉ. भा. ना. गाडेकर | १८० - १८५ |
| ४९. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. रमेश देवडे | १८६ - १८८ |
| ५०. | छत्रपती शिवरायांच्या शिक्षणाविषयीची व्यवस्था !<br>- डॉ. सुदाम जी. राठोड | १८९ - १९१ |
| ५१. | छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तित्व<br>- राजू दगडू दाभाडे | १९२ - १९४ |
| ५२. | शिवरायांचे आरमार आणि दूरदृष्टी<br>- डॉ. श्वेता बा. चौधारे | १९५ - १९७ |
| ५३. | शिवप्रतीक आणि ब्राह्मणी व अब्राह्मणी द्वंद्व : एक ऐतिहासिक आकलन<br>- डॉ. गीतांजली भीमराव बोराडे | १९८ - २०१ |
| ५४. | आधुनिक क्रांतीची मूस : छत्रपती शिवाजीराजे<br>- प्राचार्य डॉ. निशिकांत मुकुंदराव आलटे | २०२ - २०७ |
| ५५. | युगप्रवर्तक राजा : राजा शिवछत्रपती<br>- अपर्णा पाटील | २०८ - २११ |
| ५६. | शेतकऱ्यांचा राजा : छत्रपती शिवराय<br>- डॉ. माधव जाधव | २१२ - २१४ |
| ५७. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी कादंबरी 'श्रीमान योगी'<br>- डॉ. सुधाकर जाधव | २१५ - २१७ |
| ५८. | छत्रपती शिवाजी महाराज आणि वर्तमानकालीन प्रासंगिकता<br>- डॉ. एकनाथ जगन्नाथ शिंदे | २१८ - २२३ |
| ५९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक दृष्टिकोन<br>- डॉ. सुखदेव बा. पोटदुखे | २२४ - २२८ |
| ६०. | छत्रपती शिवाजी महाराजांचा समकालीन पर्यावरणविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. मारुती अर्जुन केकाणे | २२९ - २३१ |
| ६१. | छत्रपती शिवाजी महाराजांचा संरक्षणविषयक व्यूहरचनात्मक दृष्टिकोन<br>- डॉ. किशोर गिरीश नवले | २३२ - २३६ |
| ६२. | छत्रपती शिवाजी महाराजांचा मुस्लीमविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. भागवत माणिकराव वाघ | २३७ - २४० |



# सभासदाची बखर : छत्रपती शिवाजी महाराजांचे समकालीन वास्तव

- डॉ. शिवराज काचे
मराठी विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

बखर वाङ्मय मराठीतील महत्त्वपूर्ण वाङ्मयप्रवाह आहे. हे वाङ्मय मराठ्याच्या इतिहासाला अभिव्यक्त करणारे साधन आहे. बखरकाराने राजकीय इतिहासावरोबर व्यक्तीचे स्वभावचित्रण वा त्यांचे जीवनदर्शनदेखील रेखाटले आहे. हे वाङ्मय महाराष्ट्राच्या मातीमध्ये खऱ्याअर्थाने शिवकाळात बहरले आहे. शिवपूर्वकाळातदेखील मराठीमध्ये बखरलेखन झालेले होते; पण खऱ्याअर्थाने बखर वाङ्मयाचे सामर्थ्य व महत्त्व शिवकाळातच महाराष्ट्राच्या समोर आले. मराठी माणसात महाराष्ट्र धर्माचा वा छत्रपती शिवरायाच्या राजवटीचा स्वाभिमान चेतवण्याच्या हेतूने या काळात बखरींची निर्मिती झाली. छत्रपती शिवाजी महाराज हे या कालखडातील थोर, तेजस्वी आणि पराक्रमी असे युगपुरुष होते. त्याचे कार्यकर्तृत्व आणि चरित्र बखरकाराच्या लेखनाचा विषय बनले आहेत. या कालखडात आढळणाऱ्या सभासदाची बखर, शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर याचे चरित्र, शिवदिग्विजय, भोसले वंश चरित्र, शिवाजी प्रताप, ९१ कलमी बखर, शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र या बखरी आहेत. यातील निम्म्या बखरी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आकारास आलेल्या आहेत. यापैकी 'सभासदाची बखर' ही शिवकाळातील समकालीन बखर आहे. या बखरीतून आलेले छत्रपती शिजाजी महाराजाचे कार्यकर्तृत्व उल्लेखनीय आहे.

'सभासदाची बखर' ही शिवकाळातील पहिली बखर होय. कृष्णाजी अनंत सभासद यांनी ही बखर लिहिली. शिवाजी महाराजाच्या समकालीन चरित्रकाराचे पहिले चरित्रात्मक बखर लेखन यादृष्टीने ही बखर उल्लेखनीय ठरते. कारण बखरकाराला त्याच्या आश्रयदात्याकडून इतिहास लेखनाचाच आदेश दिला गेल्याचे आढळते. 'सभासद बखरीचा' प्रारंभ वा शेवट यादृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे.

## बखर लेखनाची वास्तविकता -

राजाराम महाराजांनी कृष्णाजी अनत सभासद याना पुढीलप्रमाणे आज्ञा दिली होती. असे बखरीच्या प्रारंभीच म्हटले आहे. 'आपले पिते थोरले राजे यानी इतका पराक्रम केला व चार पातशाहीशी दावा लाविला, ऐसा पराक्रम केला. तुम्ही पुरातन राज्यातील माहीत (गार) लोक आहा तरी इस्तकबिलपासून चरित्र लिहून देणे' म्हणून मी बखर लिहीत आहे' असे कृष्णाजी अनत सभासद म्हणतात. बखर लेखनापूर्वी ही आज्ञा सांगून 'त्याजवरून वर्तमान एसो जे' असे म्हणून त्यानी शिवचरित्र कथनास प्रारंभ केला. बखर लिहून झाल्यावरही कृष्णाजी अनंत सभासद म्हणतात, "ऐसे राजियाचे चरित्र-आख्यान उत्पन्न काळापासून देहवसनापर्यंत जाहले. राजा साक्षात केवळ अवतारीच. जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदापासून रामेश्वरपर्यंत व्दाही फिरली. देश कार्बाज केला. आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, मोघलाई या चारी पातशाह्या वा समुद्रातील वेबीस पादशाह असे जेरजप्त करून, नवेच राज्य साधून, मराठा पातशाहा सिंहासनाधीश छत्रपती जाहला... असे वर्तमान महाराजांचे जाहले."

शिवाजी महाराजांच्या समकालीन चरित्रकाराने लिहिलेले पहिले चरित्रात्मक बखरलेखन यादृष्टीने ही बखर महत्त्वपूर्ण आहे. ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने ही बखर उल्लेखनीय आहे. शिवाजी महाराजांच्या जीवनातील एकूण एकाहत्तर घटनाप्रसंगांचे निवेदन लेखकाने केले आहे. बहुतेक महत्त्वाच्या घटना या बखरीमध्ये समाविष्ट आहेत. यात अगदी सुरुवातीपासून पाहिले, तर शिवाजी महाराजांचे पूर्वचरित्र त्रोटक स्वरूपात आले आहे. अफजलखानाचा वध, शिवाजी महाराजांचे दिल्लीस प्रयाण, शिवराज्याभिषेक, छत्रपतींची भागानगरास भेट, शिवाजी महाराज व व्यंकोजी भेट, कारखाने, खजिना, शिलेदार, सरदार, जंजिरे, गड, कोट, इत्यादी सविस्तर

तपशिलाच्या दृष्टीने ही बखर महत्त्वपूर्ण ठरते. राज्याभिषेक व महाराजांचा मृत्यू या दोन घटनांचा कालनिर्देश बखरकाराने केला आहे. अर्थात, या बखरीमध्ये सर्वकाही ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीतून लिहिले गेले आहे असे नव्हे. काही ठिकाणी ऐतिहासिक कालक्रमाच्या दृष्टीतून विसंगती पाहावयास मिळते. काही गोष्टी मागे-पुढे झाल्या आहेत. असे असले तरी शिवकालातील बखरींपैकी 'सभासद बखर' ही प्रमाण मानली जाते.

**अवतारी पुरुष -**

छत्रपती शिवाजी महाराजांबाबत इतर सर्व महापुरुषांपेक्षा एक निराळी बाब घडली आहे. भारतात खूप राजे होऊन गेले. जे परंपरेने चालत आलेल्या वाडवडिलांच्या गादीवर बसले त्यांची संख्या तर फार मोठी आहे; पण जे राज्यनिर्माते होते. त्यांची ही संख्या खूप आहे. नवे राज्य निर्माण करणारे चांगले राजे भारताच्या इतिहासात अधूनमधून होऊन गेले. समकालीन आणि उत्तरकालीन पुरुषांनी त्यांची पुण्यवानामध्ये गणना केली; पण समकालिनांनी आणि उत्तरकालिनांनी मोठ्या श्रद्धेने जो राजा ईश्वरी अवतार मानला असा एकच ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय.

कृष्णाजी अनंत सभासद यांनी बखरलेखन करत असताना सर्व लक्ष शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर केंद्रित केले आहे. 'जिजाऊ आऊ तिचे पोटी राजश्री राजे पुत्र होताच' अशा शब्दांत शिवाजी महाराजांच्या जन्माचा उल्लेख करून 'श्री शंभुमहादेव जागृती येऊन स्वप्न आले की आपणच अवतरलो आहे.' अशा शब्दांत ते अवतारी असल्याचे सांगतात. या बखरीत शिवाजी महाराजांचे दर्शन होते. ते अवतारी पुरुष म्हणूनच. विशेषत: व्यक्तिगत माहितीपेक्षा त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे चरित्र या बखरीमध्ये विस्तृतपणे रेखाटले आहे. बखरकार महाराजांच्या पराक्रमाने दिपून गेल्याचे जाणवते. 'राजा साक्षात केवळ अवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला.' एवढेच नाही तर 'ये जातीचा कोणी मागें जाहला नाही. पुढेही होणार नाही.' असे भविष्य वर्तविते. बखरकाराने शिवाजी महाराजांना ईश्वरी अवतार मानल्याने त्यांच्या मृत्यूनंतर 'पृथ्वीरूप जाहला, गगनी धूमकेतू उदेला... शंभूमहादेव तळ्याचे उदक रक्तांबर झाले.' अशी चमत्कारिक वर्णने आली आहेत. एवढेच नाही तर 'हे पुण्यश्लोक राजीयाचे चरित्र जे वाचतील, ते पुण्यवंत होतील, निपुत्रिकास पुत्र होतील. भाग्यवंत होतील.' अशी फलश्रुतीही सांगितली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी असलेली निष्ठा, प्रेम, आदर व सहानुभूती बखरकाराच्या लेखनातून दिसून येते.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व -**

काळ सहजासहजी बदलत नसतो. काळाला मुरड घालण्याची ताकद छत्रपती शिवाजी महाराजांच्या वीरवृत्तीकडे पाहिल्यानंतर जाणवते. महाराजांपूर्वी महाराष्ट्राचा इतिहास पाहिला असता स्थिती भयाण होती. म्हणजेच यादवांच्या पराभवानंतर यवनी अमलाखाली गेलेला महाराष्ट्र निस्तेज झाला होता. येथील जनता पराधीन झाली होती. गुलामीचा अंमल सुरू होता. स्वराज्य, स्वधर्माचा येथील जनतेला विसर पडला होता. तो समाज ऐहिक जीवनाबद्दल उदासीन होता. दैववादी भूमिका स्वीकारून तो कर्मकांडात बुडाला होता. शूरता, साहस, पराक्रम हे गुण परराजांच्या दावणीला बांधले गेले होते. म्हणजेच सर्व मराठी समाज दुबळा झाला होता. पूर्णपणे निराशेच्या गर्तेत गेला होता.

महाराष्ट्राची ही दुर्दशा पाहून शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने आणि युद्धचातुर्याने मराठी साम्राज्याची पुनर्स्थापना करून आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने राष्ट्रभक्ती व स्वामीनिष्ठेचे वारे वाहू लागले. मराठी माणसाच्या मनात परिवर्तन होऊन अस्मितेचे तेज झळकू लागले. शिवाजी महाराजांनी आपल्या कर्तृत्वाने जणूकाही नूतन सृष्टीच निर्माण केली. औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूची झोप उडवून टाकली. शिवाजी महाराज न्यायाने, नीतीने. धर्माने वर्तन करणारे आदर्श राजे होते. त्यानी शेकडो लढाया जिंकल्या, मैदानात, डोंगरावर, समुद्रकिनारी तीन-चारशे किल्ले बांधले. नवीन सैन्य तयार केले. नवीन आरमार उभे केले. नवे कायदे केले. एवढेच नाही तर स्वभाषेला उत्तेजन दिले. कवी लोकांना आश्रय दिला. शीलाने व सचोटीने व्यवहार केला. स्वजनांचे रक्षण केले. महाराजांची खाजगी वर्तणूक आणि सार्वजनिक पराक्रम इतका लोकोत्तर होता की, महाराष्ट्रीय जनतेसाठी ते साक्षात ईश्वरावतार ठरले होते. शिवाजी महाराजांचे हे लोकोत्तर रूप या बखरीतून प्रत्ययकारीपणे व्यक्त झाले आहे.

शिवाजी महाराज जसे पराक्रमी होते, तसेच ते प्रज्ञावंत महापुरुष होते. कलियुगात क्षत्रिय राहिले नाहीत. या कल्पनेचा त्यांनी अव्हेर केला. स्वत:ला 'क्षत्रिय कूलावतंस' म्हणून घेतले. पुढे त्यांनी स्वराज्याभिषेकदेखील करवून घेतला. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने त्या काळातील संपूर्ण

समाजजीवन प्रभावित झाले. त्यांच्यामुळे मराठी समाजाला नवे तेज, नवे आत्मभान लाभले. शिवाजी महाराजांच्या बरोबरीने येथील सर्वसामान्य मावळा शौर्य व साहस दाखविण्यासाठी सक्षम झाला. शिवाजी महाराजांच्या पराक्रमातून तत्कालीन समाजामध्ये घडलेल्या परिवर्तनाचे चित्र या बखरीमधून बखरकाराने फार चांगल्याप्रकारे रेखाटले आहे.

**शिवाजी महाराजांचे व्यक्तिदर्शन -**

कृष्णाजी अनंत सभासद यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तिदर्शन अत्यंत नीटनेटके व चपखल स्वरूपात केले आहे. अत्यंत प्रतिकूल व विपरीत परिस्थितीवर मात करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. साहस व पराक्रमाच्या बळावर त्यांनी शत्रूशी दोन हात केले. कौशल्यपूर्ण युद्धनीतीच्या आधारे शिवाजी महाराजांनी शत्रूला झुलवीत ठेवले तुटपुंज्या सैन्याच्या मदतीने त्यांनी बलाढ्य अशा यवन सत्तेशी मोठ्या निकराने लढा दिला. यासाठी त्यांच्याकडे असलेल्या संघटन कौशल्याचा प्रत्यय येतो. मावळ्याची संघटना उभारून त्यांनी चारी पातशाह्यांशी संघर्ष केला. 'वस्तुत: मनुष्यबळ शत्रूपक्षाच्या तुलनेने अत्यल्प असूनही शिवरायांनी तेवढ्या बळाच्या जोरावर आपले स्वतंत्र राज्य स्थापिले. ही घटना महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या इतिहासातदेखील अनन्यसाधारण आहे. या सहकाऱ्यांना नेहमी विश्वासात घेऊन ते आपल्या मोहिमांची वा भावी कार्याची काळजीपूर्वक आखणी करत असत. हे करत असताना छत्रपती शिवाजी महाराजांवर अनेक जीवघेणे प्रसंग बेतले; परंतु प्रत्येक प्रसंगातून मोठ्या युक्तीने आणि बुद्धिचातुर्याने ते सहीसलामत बाहेर पडले. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली झुंज या बखरीमध्ये प्रभावीपणे शब्दबद्ध झाली आहे. त्यांच्या जवळ पुरेसे मनुष्यबळ नव्हते. अशाही परिस्थितीत शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. साम्राज्यविस्तार केला. याविषयीचे बखरीतील चित्रण अद्‌भुत आणि विलक्षण परिणामकारक आहे.

शिवाजी महाराजाच्या व्यक्तिमत्त्वातील धैर्य, साहस, पराक्रम, चातुर्य, वीरत्व इत्यादी गुणांचे सुरेख दर्शन बखरीतून घडते. शिवाजी महाराजांच्या भावजीवनाचे कौटुंबिक रेखाटनही येथे साकार होते. त्यांच्या जीवनाचे साक्षेपी दर्शनही घडते. शिवाजी महाराज पराक्रमी योद्धा, आदर्श राजा, महान प्रशासक होते. याचे चित्रणही पाहावयास मिळते, "बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा पिकांच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्यात, दोन तक्षिमा दिवानात घ्याव्या, येणेप्रमाणे रयतेपासून घ्यावे. नवी रयत येईल त्यास गुरेढोरे द्यावी. बीजास दाणापैका द्यावा. भक्षावयासि दाणापैका द्यावा. ये जातीचे रयतेचें पालग्रहण करावे." स्वराज्यातील रयतेला त्यांच्या कष्टाचे योग्य मोल मिळाले पाहिजे. कर आकारणीत कोणत्याही प्रकारची जबरी केलेली दिसून येत नाही. शिवाजी महाराज जसे आदर्श राजा, महान प्रशासक होते, तसेच ते युद्धतज्ञ, चारित्र्यसंपन्न महापुरुष, उदार राजा इत्यादी विविध पैलू येथे वेधकपणे प्रकट झाले आहेत. याबरोबरच आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श पिता, आदर्श मित्र अशा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील नानाविध पैलूंचे रेखाटन बखरकाराने अत्यंत मार्मिकपणे केलेले आहे.

**प्रसंगवर्णन -**

सभासद बखरीतील प्रसंगवर्णने अत्यंत प्रभावी स्वरूपाची आहेत. ते प्रसंग आपल्या डोळ्यादेखत घडत आहेत, असे चित्र उभे केले आहे. यात अफजलखानाचा वध, शहिस्तेखानाचे पारिपत्य, औरंगजेब-शिवाजी महाराज भेट, आग्र्याहून सुटका, भागानगरच्या कुतुबशहाची भेट आणि राज्याभिषेक समारोह हे प्रसंग या बखरीमधून प्रभावीपणे साकार झाले आहेत. शिवाजी महाराज व अफजलखान भेटीचे वर्णन करताना लेखक लिहितो, "राजीयानें भेटी देतां खानाने राजीयांची मुंडी कवटाळून काखेखालि धरिली आणि हाताची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीत राजीयांनी चालविली तो अंगात जरीची कुडती होती त्यावरि खरखरली अंगास लागली नाही. हे देखोन राजीयानी डावे हाताचें वाघनख होते, तो हात पोटात चालवला. खानाने अंगात झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करिताच खानाची चरबी बाहेर आली. दुसरे हात, उजवे हाताचे बिचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून मुंडी असडून, चौथरियाखाले उडी घालोन निघोन गेले. खानाने गलबला केला की, मारिले! मारिले! दगा दिधला!!.. वेगी धावा." या चरित्रात रेखाटण्यात आलेला अफजलखानाच्या वधाचा प्रसंग म्हणजे एक रोमहर्षक नाट्यच होय. या प्रसंगवर्णनात वाचकाच्या मनाची उत्कंठा वाढवणारी मांडणी झाल्याचे दिसून येते.

शिवाजी महाराजांनी केलेली युद्ध, त्यांची वीरवृत्ती याचे वर्णनही अतिशय रोचकपणे आलेली आहेत. त्यात अफजलखानाच्या सैन्याशी झालेले युद्ध, सिंहगडावरील तानाजी - उदयभान यांचे युद्ध असो, अथवा मुगरबाजी-

दिलेरखान यांचे पुरंदर गडावरील युद्ध असो, ही सर्व युद्धवर्णने अतिशय वेधकपणे आली आहेत. सालेरीच्या युद्धाचे वर्णन करताना लेखक लिहितो, "प्रतापराव सरनोबत व मोरोपंत पेशवे उभयता सालेरीस पावले एकतर्फेने मावळे लोक शिरले आणि मारामारी केली. मोठे युद्ध जाहलें. चार प्रहर युद्ध जाहलें. मोंगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफांची, हत्ती, उंटे आराबा घालून युद्ध जाहले. युद्ध होतांच पृथ्वीचा धुराळा असा उडाला की, तीन कोश औरस-चौरस आपले व परके माणूस दिसत नव्हते. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहले, उंट, हत्ती (यास) गणना नाही. रक्ताचे पूर वाहिले, रक्ताचे चिखल जाहले. त्यामध्ये रुतो लागले. असा कर्दम जाहला." या वर्णनातून युद्धाची भीषणता लक्षात येते.

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषकाचा प्रसंगही अत्यंत तोलामोलाने रेखाटण्यात आला आहे. शिवाजी महाराजांच्या देहावसानाचा प्रसंग तर फारच उत्कट व करुणगंभीर स्वरूपाचा आहे. या प्रसंगाचे रेखाटन पुढीलप्रमाणे आहे. "राजा व्यथा ज्वराची जाहली. राजा पुण्यश्लोक कालज्ञान जाणे, विचार पाहता आयुष्याची मर्यादा जाली असे कळून... मातबर लोक जवळी बोलावून आणिले. मग त्यास सांगितले की, 'आपली आयुष्याची अवधी जाली. आपण कैलासास श्रीचे दर्शन जाणार... परंतु मज माघारें हे राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाही' येणेप्रमाणे राजे बोलिले. सर्वांचे कंठ दाटून नेत्रापासून उदंभ स्रवू लागले. परम दुःख जाले." या प्रसंगवर्णनातील कारुण्य आणि गांभीर्य भेदक भावावस्थेचे चित्र साकारते.

**सारांश -**

कृष्णाजी अनंत सभासद यांचा चरित्रनायकाविषयी असलेला जिव्हाळा पाहावयास मिळतो. राजाविषयी आत्मीयेतचा व आदराचा भाव बखरीतून प्रकट झाला आहे. व्यक्तिदर्शन, युद्धवर्णन याबरोबर तत्कालीन सामाजिक जीवन व संस्कृती याचे प्रतिबिंबही या बखरीत आलेले आहे. शिवकालापूर्वी बखरीचे लेखन झाले असले तरी, शिवकालापासूनच खऱ्या अर्थाने बखर वाङ्मयाला वळण कसे लाभले, याचे प्रत्यंतर देणारी ही बखर आहे. मराठ्यांच्या स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराज यांचे पहिले चरित्र त्यांच्या समकालीन बखरकाराने लिहिले आहे. यामुळेच शिवाजी महाराजांचे समकालीन वास्तव समर्पकपणे चित्रित झालेले आहे.


**निष्कर्ष -**

१. शिवाजी महाराजांच्या समकालिनांनी लिहिलेली बखर असल्याने ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे.
२. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी असलेली निष्ठा, प्रेम, आदर व सहानुभूती बखरकाराच्या लेखनातून दिसून येतो.
३. परकीयांच्या अमलामुळे निस्तेज झालेल्या महाराष्ट्राला नवसंजीवनी देण्याचे कार्य शिवाजी महाराजांनी केले.
४. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने त्या काळातील संपूर्ण समाजजीवन प्रभावित झाले होते.
५. शत्रूपक्षाच्या तुलनेत अत्यल्प मनुष्यबळ असूनसुद्धा स्वतंत्र राज्य स्थापन केले. ही घटना महाराष्ट्राच्याच नाही तर भारताच्या इतिहासातदेखील अनन्यसाधारण आहे.
६. मराठ्यांच्या स्वराज्याचे संस्थापक म्हणून शिवाजी महाराजांकडे आदराने पाहिले जाते.

**संदर्भ ग्रंथ -**


१. डॉ. ग्रामोपाध्ये ग. ब. (संपा.) 'मराठी बखर गद्य', व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या' ३८१ क, शनिवारपेठ, पुणे - २, द्वि. आ. १९६३
२. डॉ. पठाण यू. म. (संपा.) 'कृष्णाजी अनंत सभासदविरचित 'श्री शिवप्रभूचे चरित्र' (सभासद बखर), समर्थ प्रकाशन, टिळक रोड, औरंगाबाद, प्र. आ. १९७४
३. हेरवाडकर र. वि. (संपा.) 'कृष्णाजी अनंत सभासदविरचित 'शिवछत्रपतींचे चरित्र' (सभासद बखर), व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या' ३८१ क, शनिवारपेठ, पुणे - २, प्र. आ. १९८६
४. सकपाळ बापुजी 'बखर वाङ्मय : उद्गम आणि विकास', दास्ताने प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८२


◆◆◆◆◆



MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ।।ध्रु०।।
लंगोटयांस देई जानवीं पोषींदा कूणब्याचा ।
काल तो असे यवनांचा ।।
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजीचा ।
असे तो डौल जहागिरीचा ।।
पंधराशें एकूणपन्नास साल फळलें ।
जुन्नर तें उदयासी आलें ।।
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें ।
जिजीबाईस रत्न सांपडलें ।।
हातापायांचीं नखं बोटं शुभ्र प्याजी रंगीलें ।
ज्यांनीं कमळा लाजिवलें ।।
वरखालीं टिर्याख पोटर्याय गांठी गोळे बांधले ।
स्फटिकापरि भासले ।।
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावलें ।
नांव शिवाजी शोभलें ।।

- महात्मा जोतिराव फुले

